# MINUTES OF THE PUBLIC HEARING FOR PROPOSED EXPANSION OF EXISTING UNIT OF SUGAR WITH CRUSHING CAPACITY FROM 2,500.0 TCD TO 7,500.0 TCD, CO-GEN POWER FROM 12.0 MW TO 32.0 MW AND COMMISSIONING OF NEW DISTILLERY/ETHANOL PLANT – 120.0 KLPD WITH 4.0 MW CAPTIVE POWER PLANT AT GAT NO.15/A, 16, 33(PART), VILLAGE-PADAL, TAL -KHATAV, DIST – SATARA, MAHARASHTRA BY PROJECT PROPONENT M/S KHATAV MAN TALUKA AGRO PROCESSING LTD.

The Public Hearing for proposed expansion of existing unit of Sugar having cane crushing Capacity from 2,500.0 TCD to 7,500.0 TCD; Co-Gen Power from 12.0 MW to 32.0 MW and commissioning of New Distillery/Ethanol Plant – 120 KLPD with 4.0 MW Captive Power Plant at Gat No.15/A, 16, 33 (Part), Village – Padal, Tal – Khatav, Dist – Satara, Maharashtra by Project Proponent M/s Khatav Man Taluka Agro Processing Ltd., was conducted on Tuesday, the 14th September, 2021 at the site of the said industry at 11.00 a.m.

As per the Notification dated 14-09-2006 issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (MoEFCC, GoI), New Delhi and subsequent amendment on 01-12-2019, Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai has constituted Public Hearing Panel vide Board's Office Order No. E- 76 of 2021 under letter no. BO/JD (WPC)/PH/B- 210908-FTS-0114, , dated 08th September, 2021:-

| | |
|---|---|
| 1) District Magistrate-Satara or his representative not below the rank of an Additional District Magistrate | **Chairman** |
| 2) Regional Officer, MPCB, Pune (Representative of Maharashtra Pollution Control Board) | **Member** |
| 3) Sub Regional Officer, MPCB, Satara | **Convener** |

Shri L. S. Bhad, Sub Regional Officer, MPCB, Satara and Convener of the Public Hearing Committee welcomed all and informed that the meeting is called in the background of Covid-19. Hence, it is requested to all the participants to follow strict guidelines of Govt. of India in this regard. As per the guidelines, only 100 persons are allowed in a session. If the participants are more, then remaining will be allowed in next session. The sessions will continue till all the participants are given opportunity to attend the meeting. The thermal checking and use of sanitizer is kept at the entrance of the pandol and now it is compulsory to wear a mask and follow the social distancing amongst the persons in the meeting hall.

Shri L. S. Bhad, Sub Regional Officer, MPCB, Satara and Convener of the Environment Public Hearing Committee welcomed Shri Sunil Thorve, Additional District Magistrate, Satara and Chairman of the Environment Public Hearing Committee; Shri Nitin Shinde, In-charge Regional Officer, MPCB, Pune and Member of the Environment Public Hearing Committee; Environmentalists, NGOs, Journalists and Company Officials and local people/participants who were present and informed that as per the Environment Impact Assessment Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEF & CC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public consultation to certain projects which are covered in the schedule of the said Notification.

Maharashtra Pollution Control Board was in receipt of application from Project Proponent M/s Khatav Man Taluka Agro Processing Ltd. at Gat No.15/A, 16, 33 (Part), Village – Padal, Tal – Khatav, Dist – Satara, Maharashtra, for their proposed expansion existing unit having Sugar cane crushing Capacity from 2,500.0 TCD to 7,500.0 TCD; Co-Gen Power from 12.0 MW to 32.0 MW and commissioning of New Distillery/Ethanol Plant – 120 KLPD with 4.0 MW Captive Power Plant.

The Convener further informed that this existing project is established outside the Industrial Zone and as per EIA Notification, 2006 the category of project falls under Category A 1 (d), 5 (j) and 5 (g), which requires to obtain prior Environmental Clearance from the Environment, Forest and Climate Change Department, Govt of India, New Delhi (MoEF & CC, GoI), for which prior environmental consultation is mandatory.

Convener informed that the aim of conducting prior public consultation is to make aware, local people who can be participant in the hearing and they should know the developmental activities and Environment Management Plan of the unit.

Project Proponent had submitted online prescribed application alongwith pre-feasibility report to the MoEF & CC, GoI, New Delhi with Terms of Reference (ToR) to conduct EIA studies and MoEF & CC, GoI, New Delhi has considered the project and given online approval on 22-01-2021.

As per the Office Memorandum issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, New Delhi (MoEFCC, GoI) dated 14th September, 2020, while conducting the public hearing, certain guidelines are issued such as thermal checking, use of sanitizers. wearing of mask, keeping social distancing.

As per said Notification, 30 days' advance public notice was published by Sub Regional Office, MPCB Satara in the Local Newspaper in Daily Lokmat in Marathi and in National Newspaper daily Indian Express in English on 13-08-2021. The public in general were appealed to send their suggestions, views, doubts or objections regarding the proposed unit.

Also copy of EIA report and executive summery were made available at various notified offices of Government i.e. Ministry of Environment, Forest & Climate Change, Zonal Office, West Central Zone, New Secretariat Building, Ground Floor, East Wing, Civil Line, Nagpur-440 001; District Magistrate Office, Satara; Additional District Magistrate Office, Satara; Zilla Parishad Office, Satara; District Industries Centre Office, Satara; Tahsildar Office- Vaduj (Khatav), Tahsil Office – Vaduj, Tal-Khatav, District – Satara; Grampanchayat office at Padal, Tal – Khatav, Dist – Satara; Sub Regional Office, MPCB, Satara; Regional Office, MPCB, Pune and at Head Office of MPCB at Mumbai, Environment & Climate Change Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, Mumbai and on the website of MPCB. The public in general were appealed to send their suggestion or objection regarding the proposed expansion of Sugar, Co-Gen & new distillery project.

Convener informed that for the above project, Sub Regional Office, MPCB, Satara is in receipt of suggestions and support from Shri H. Madhu Babu, President, Rural Environment Education & Health Awareness Society, Mushirabad, Hyderabad.

Convener informed that participants can raise their views, suggestions/objections for the proposed expansion of the project in environmental angle only, neither or orally as well as in writing also.

Convener requested Chairman of the Public Hearing Committee to start the proceedings.

With the permission of Chairman, Project Environment Consultant gave geographical location of the proposed unit, proposed impact on the environment due to proposed project and details of Environment Management Plan of the proposed unit.

Environment Consultant informed that Project Proponent has reserved capital investment fund of Rupees 505/- Lakh for various Environment Protection System and for their annual maintenance, Rs. 44.50 lakhs are reserved.

It is informed by the Environment Consultant that not a drop of treated effluent will be discharged outside the factory premises and this project is Zero Liquid Discharge (ZLD). The most advance technology of Electro Static Precipitator will be installed in the project for the control of air pollution. Due to this expansion of the project, local people will get job opportunities and there will be tremendous increase in the local business.

Environment Consultant informed that as the expansion will be carried in the existing project site only, there is no requirement of extra land. The 70% water is in sugarcane crop itself, which will be removed in the process and it will be treated and reused in the manufacturing process.

After presentations, Convener, Environment Public Hearing Committee appealed the participants to raise their views, suggestions or objections regarding propose plant in environmental angle only.

**Following persons have taken part in the discussions and the answers given by Project Environment Consultant/Project Proponent/ Environment Public Hearing Committee:-**

1) **Shri Bhushan Desai, Resident-Datewadi, Tal-Khatav,Dist-Satara:-**

   How much fresh water will be consumed for expansion of project and for new distillery project? As our area is drought prone area, whether there will be any ill-effects due to the consumption of fresh water by the company.

   Environment Consultant answered that for the expanded project and for new distillery unit, there will be requirement of 1500-1600 M3/day of fresh water. The water from the sugarcane crop itself will be recovered and will be used in the production activities. Hence, there will be less requirement of fresh water. This project will be Zero Liquid Discharge (ZLD) and the treated industrial effluent and will be reused in the production activities. There will not be any ill-effects at the surrounding villages and people residing in the vicinity.

2) **Shri Vithal Shivaji Fadatare, Resident – Khatwal gaon, Tal – Khatav, Dist – Satara :-**

   Whether sewage produced/generated in the production activities can be used for agriculture purposes after treatment.

   Environment Consultant informed that not a drop of treated effluent will be discharged outside the project. The industrial effluent will be treated and will be reused in the manufacturing process. The sludge will be made available to the local farmers to be used as manure. The ash which will be generated will be made available to brick manufacturers for manufacturing bricks.

3) **Shri Chandrakant Prabhakar Yalmar, Resident – Kanharwadi, Tal – Khatav, Dist – Satara :-**

   Shri Yalmar while objecting informed that our Kanharwadi village located about is 2.0 kilometer away from the project. They have their own grape garden/fields and

grapes are exported to Europe. But black ash from the boiler stack do spread in our grape fields & may damage grape quality. Hence, the exporter rejects the grape crops. We had loss of more than Ten Lakhs Rs. of rupees until now.

Environment Consultant informed that Electro Static Precipitator is already installed in the project. Shri Yalmar objected that even though, the black ash is spread on the fields of grape. When grapes are sent to cold storage, the grapes become black. Environment Consultant informed that, they are following all the strict guidelines as specified by the Government.

Here In-charge Regional Officer, MPCB, Pune and Member, Environment Public Hearing Committee directed Environment Consultant to assure in the meeting to solve the problem of the concerned person. Member, Environment Public Hearing Committee further directed to Project Proponent to install the ESP of higher capacity. Environment Consultant promised to install the ESP of 50.0 Nm3.

4) **<u>Mrs. Manisha Chetan Sanap, Sarpanch, Padal Grampanchayat, Tal – Khatav, Dist – Satara :-</u>**

Whether generation of spent wash will affect the local people?

Environment Consultant answered that spent wash and bagasse will be burnt in the incineration boiler. Hence, local people will not suffer anything.

5) **<u>Shri Satish Patil, Residence-Palasgaon, Tal-Khatav, Dist – Satara :-</u>**

How the distillery project will benefit the surrounding villages?

Environment Consultant answered that the Ethanol will be produced in the distillery project. As per the directives of the Central Government, it will be used for blending in the petrol. Hence, the factory will get additional income. Due to expansion of the project and commissioning of new distillery project, there are job opportunities in the project. Also due to expansion, there will be tremendous growth in the local business.

Convener, Environment Public Hearing Committee appealed all the participants to raise any suggestions, objections.

6) **Shri Sunil Thorve, Chairman, Environment Public Hearing Committee :-**

Chairman, Environment Public Hearing Committee again appealed all participants to raise any suggestions, objections regarding the proposed project in environmental angle only. He said that in the morning there were two phone calls from the local residents. If both the local persons are present, they may raise their views orally. If anybody desires, they can submit the written suggestions/objections also in this meeting. If anybody desires, they can submit written objections to the Sub Regional Office, MPCB, Satara today only by email or by hand delivery today only. It should be submitted today only. The submissions will be accepted today only, afterwards it will not be accepted. The suggestions, objections, views expressed in writing will be forwarded to Government for further consideration.

7) **Shri Pradip Kharat, Gram Sevak, Padalgaon, Residence – At Post – Padalgaon, Tal-Khatav, Dist – Satara :-**

Shri Pradip Kharat, Gram Sevak, Padalgaon objected that after starting of crushing season, farmers do come with Trolleys to hand over the sugarcane in the factory. Then they go to east and west side for the toilet. Due to human excreta, local people cannot walk at that side. It is also observed by the local people that bottles of liquor/wine, beer are thrown there. What steps will be taken by the project proponent to avoid sufferings of the local people.

The Managing Director of the Project Proponent informed that the objection raised is noted. The toilet blocks and drinking water facilities will be provided.

Convener, Environment Public Hearing Committee again appealed all participants to raise any views, suggestions or objections regarding the proposed project in environmental angle. There was no response from the participants.

Convener, Environment Public Hearing Committee remarked that the questions raised by the participants are answered by the Environment Consultant.

The minutes of the meeting in English and Marathi will be prepared and it will be sent alongwith written suggestions and Final Environment Impact Assessment Report to an Expert Committee of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India. An Expert Committee will take further decision.

He thanked all Government Officials, Project Officials and local people for attending the meeting and on behalf of the Chairman of the Environment Public Hearing Committee declared that the meeting is concluded.

The meeting ended extending thanks to the Chair.

The one suggestion & one objection received are enclosed.

| | |
|---|---|
| **(L. S. Bhad)** | **( Nitin Shinde , )** |
| Convener,<br>Environment Public Hearing Committee<br>And<br>Sub Regional Officer,<br>MPCB, Satara | Member,<br>Environment Public Hearing Committee<br>And<br>In-charge Regional Officer,<br>MPCB, Pune |

**(Sunil Thorve)**
Chairman,
Environment Public Hearing Committee
And
Additional District Magistrate-Satara,
Dist – Satara

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स खटाव माण तालुका एग्रो प्रोसेसिंग लिमिटेड, गट नं.१५/अ, १६, ३३ (भाग), मुक्काम पोस्ट-पडळ, तालुका-खटाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या सध्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ३२.० मेगावॅट पर्यत आणि नवीन आसवणी प्रकल्प - १२०.० केएलपीडी/इथेनॉल प्रकल्पासह ४.० मेगावॅट कॅप्टिव्ह क्षमतेचा ऊर्जा प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स खटाव माण तालुका एग्रो प्रोसेसिंग लिमिटेड, गट नं.१५/अ, १६, ३३ (भाग), मुक्काम पोस्ट-पडळ, तालुका-खटाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ३२.० मेगावॅट पर्यत आणि नवीन आसवणी प्रकल्प - १२०.० केएलपीडी/इथेनॉल प्रकल्पासह ४.० मेगावॅट कॅप्टिव्ह क्षमतेचा ऊर्जा प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-७६/२०२१, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी -२१०९०८-एफटीएस-०११४, दिनांक ०८-०९-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

बैठकीच्या सुरवातीस श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उरलेल्या व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारिरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. त्यांनी बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री भड, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स खटाव माण तालुका एग्रो प्रोसेसिंग लिमिटेड, गट नं.१५/अ, १६, ३३ (भाग), मुक्काम पोस्ट-पडळ, तालुका-खटाव, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांचा कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १२.० मेगावॅट प्रतिदिन वरुन ३२.० मेगावॅट पर्यत आणि नवीन आसवणी प्रकल्प - १२०.० केएलपीडी/इथेनॉल प्रकल्पासह ४.० मेगावॅट कॅप्टिव्ह क्षमतेचा ऊर्जा प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - **श्रेणी अ मध्ये** [साखर उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - १ (डी)] अंतर्गत मोडत आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २२-०१-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरील पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणीची सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सातारा, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तहसीलदार, वडूज (खटाव), तहसील कार्यालय-वडूज, तालुका-खटाव, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय - मुक्काम पोस्ट-पडळ, तालुका-खटाव, जिल्हा - सातारा, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय - मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सातारा, व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सातारा यांना ईमेलव्दारे रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन एण्ड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, हैद्राबाद यांच्याकडून प्रकल्पास पाठिंबा देताना काही सूचना प्राप्त झालेल्या आहेत. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. श्री भड यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत

माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक विविध पर्यावरण संरक्षण सयंत्रणेसाठी भांडवली गुंतवणूक रुपये ५०५/- लक्ष करणार असून वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी ४४.५० लक्ष खर्च करणार आहेत. त्यांनी सांगितले की प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. प्रकल्पातील हवा प्रदूषणाच्या संरक्षणासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर अशी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार असून परिसरातील व्यवसायात अप्रत्यक्ष मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले सदरहू प्रकल्प विस्तारिकरण कार्यरत प्रकल्प स्थानावरच करणार असल्याने विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन लागणार नाही. ऊसामध्ये ७०% पाणी असते. उत्पादन प्रकियेत तयार झालेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. तसेच प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>श्री भूषण देसाई, राहणार-दातेवडी,तालुका-खटाव, जिल्हा-सातारा:-</u>**

या प्रकल्प विस्तारीकरणासाठी आणि नवीन आसवणी प्रकल्पासाठी किती पाणी खर्च होईल? त्याचा दुष्परिणाम काही होईल काय, कारण आमचा परिसर दुष्काळ पट्टयात येतो.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प विस्तारिकरण आणि नवीन आसवणी प्रकल्पासाठी १५००-१६०० घनमीटर प्रति दिवस पाण्याची आवश्यकता आहे. उत्पादन प्रकियेत ऊसातील पाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे ताज्या पाण्याची गरज कमी प्रमाणात राहिल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे आजूबाजूच्या खेड्यात पर्यावरणावर व तेथील लोकांना कुठलाही दुष्परिणाम होणार नाही.

२) **<u>श्री विठ्ठल शिवाजी फडतरे, राहणार-खातवळ गाव, तालुका-खटाव, जिल्हा-सातारा:-</u>**

कारखान्यात उत्पन्न होणारे सांडपाणी प्रक्रिया करुन शेतीसाठी वापरता येईल काय?

सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनप्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. जो स्लज उत्पन्न होईल, ते खत म्हणून

शेतकरी शेतात वापरू शकतात. त्याचप्रमाणे उत्पादन प्रक्रियेतून उत्पन्न होणारी राख ही स्थानिक वीटभट्टीधारकांना वीटा तयार करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) **श्री चंद्रकांत प्रभाकर यलमर, राहणार-कान्हरवाडी, तालुका -खटाव, जिल्हा-सातारा:-**

श्री यलमर यांनी आक्षेप नोंदविला की आमचे कान्हरवाडी गाव हे प्रकल्पापासून दोन कि.मी. अंतरावर आहे. त्यांची स्वत:ची द्राक्षबाग असून त्यांची द्राक्षे ही युरोपला निर्यात होतात. मात्र कारखान्यातील बॉयलरमधून उत्पन्न होणारी काळी राख ही द्राक्षाच्या शेतात पडते, त्यामुळे निर्यातदार ते द्राक्षपीक नाकारल्याचा शिक्का मारतात. त्यामुळे अद्यापपावेतो दहा लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की यासाठी प्रकल्पात ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर) कार्यान्वित करण्यात आलेला आहे. श्री. यलमर यांनी आक्षेप नोंदविला की तरीसुध्दा काळी राख ही शेतात येते. द्राक्षे कोल्ड स्टोरेजला गेले की काळी पडतात. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही सर्व शासकीय निर्देशांचे काटेकोर पालन करत आहोत.

येथे प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना निर्देश दिले की संबंधित स्थानिक व्यक्तीची अडचण दूर करण्याचे आश्वासन जनसुनावणी बैठकीत देण्यात यावे. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जास्त क्षमतेचा ईएसपी बसविण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात ५० एनएमक्युब क्षमतेचा ईएसपी बसविण्यात येईल.

४) **सौ. मनीषा चेतन सानप, सरपंच, पडळ ग्रामपंचायत, तालुका-खटाव,जिल्हा-सातारा:-**

स्पेंट वॉशचा / सांडपाण्याचा स्थानिकांना काही त्रास होईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की स्पेंटवॉश व बगॅस हे इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येणार आहे. त्यामुळे त्याचा स्थानिकांना काहीही त्रास होणार नाही.

५) **श्री सतीश पाटील, राहणार-पळसगाव, तालुका-खटाव, जिल्हा-सातारा:-**

सदरहू आसवणी प्रकल्पामुळे आसपासच्या गावांना काय फायदा होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पात इथेनॉलचे उत्पन्न करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार ते पेट्रोलमध्ये ब्लेंडिंगसाठी वापरण्यात येईल. त्यामुळे कारखान्यास जास्त उत्पन्न मिळेल. प्रकल्प विस्तारिकरण व नवीन आसवणी प्रकल्पामुळे रोजगारांची संधि प्रकल्पात आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्प विस्तारिकरणामुळे परिसरातील व्यवसायात अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वाढ होईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

६) **<u>श्री सुनील थोरवे, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण समितीः-</u>**

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना नियोजित प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची सूचना केली. श्री थोरवे ह्यांनी सांगितले की सकाळी त्यांना दोन स्थानिक नागरिकांचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत फोन आलेले होते. त्यांना जनसुनावणीस उपस्थित राहण्याची सूचना केलेली होती. जर संबंधित स्थानिक नागरिक उपस्थित असतील, तर त्यांनी त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित कराव्यात किंवा पर्यावरण समितीस लेखी सादर कराव्यात. ज्यांना लेखी स्वरुपात सादर करायच्या असतील, त्यांनी लेखी किंवा मेलव्दारे स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ सातारा यांना आजच पाठवाव्यात. त्या आजच्या आज सादर करण्यात याव्यात. नंतर सादर करण्यात आल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही. संबंधित सूचना, आक्षेप शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील.

७) **<u>श्री प्रदीप खरात, ग्रामसेवक, पडळगाव, राहणार-मुक्काम पोस्ट-पडळ, तालुका-खटाव, जिल्हा-साताराः-</u>**

श्री प्रदीप खरात, ग्रामसेवक, पडळगाव यांनी आक्षेप नोंदविला की ऊस उत्पादक शेतकरी हा गळीत हंगाम सुरु झाल्यानंतर ट्रॉली घेऊन ऊसाचे पीक कारखान्यात देण्यासाठी येतात. नंतर शेतकरी पुर्वेला आणि पश्चिमेला टॉयलेटला जातात. त्याचप्रमाणे तेथे दोन्ही बाजूस मोठया प्रमाणात दारुच्या बाटल्या पडलेल्या असतात. त्याचा स्थानिकांना त्रास होतो. तरी याबाबत कारखाना व्यवस्थापन काय उपाययोजना करणार आहे?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की उपस्थित केलेला आक्षेप योग्यच आहे. शेतक-यांसाठी स्वतंत्र टॉयलेट व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरविण्यात येईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना नियोजित प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची सूचना केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद आला नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांनी विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त इंग्रजी व मराठीत तयार करण्यात येईल व सदरहू इतिवृत्तासोबत प्राप्त झालेल्या लेखी सूचना व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारच्या पर्यावरण, वन व जल वायू परिवर्तन मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल.

त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व माननीय अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगीत करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले एक सूचना व एक आक्षेप सोबत जोडलेले आहे.

**(एल. एस. भड)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,सातारा

**(नितीन शिंदे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे

**(सुनील थोरवे, )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा